# भारत जोडो युवा अकादमी किनवट जि. नांदेड
# वार्षिक अहवाल – 2023-24

### दि. 02.04.2023 भारत जोडो युवा अकादमीची वार्षिक बैठक संपन्न

भारत जोडो युवा अकादमीची वार्षिक सर्वसाधारण व कार्यकारी मंडळाच्या बैठका घेण्यात आल्या, यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, उपाध्यक्ष प्रा. सविता शेटे, सचिव श्री माधव बावगे, सदस्य श्री मुरलीधर बेलखोडे, प्रा. डॉ. शारदा कदम, ज्ञानेश्वर उईके व प्रा. राजेश कांबळे (ऑडिटर, नांदेड), अभियंता गौतम मेहता पुणे, अभियंता संकेत आंबटकर, अभियंता महादेव चव्हाण, प्रा. सुभाष काळे (साने गुरुजी महाविद्यालय, इस्लापुर), प्रेमचंद बस्सी (मुख्याध्यापक, साने गुरुजी इंग्लीश स्कुल, बोधडी , मनोज चनमनवार, संजय बोलेनवार यांची उपस्थिती होती.

## *आरोग्य विभाग*

### दि. 07.04.2023 जागतिक आरोग्य दिन

जागतिक आरोग्य दिना निमीत्त साने गुरुजी रुग्णालयात फलक लावुन साजरा करण्यात आला.

दि. 24.07.2023 मोफत दंत व रक्त तपासणी शिबीर

सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या विद्यालय, सुभाषनगर किनवट येथील 40 मुलींची दंततपासणी आणि 40 मुलींची रक्त तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. अश्विनी भंडारे, दंतरोग तज्ञ, समद शेख, विपीन पवार साने गुरुजी पॅथॉलॉजी लॅब, यांनी तपासणी केली.

### दि. 1.07.2023 डॉक्टर्स डे

डॉक्टर्स दिना निमित्त स्व.उत्त्मराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र येथे डॉ. अशोक बेलखोडे यांचा सत्कार करण्यात आला. संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.डॉ. शिवाजी गायकवाड व त्यांचे विद्यार्थी उपस्थित होते.

### दि. 09.08.2023 परिख फाऊंडेशनच्या आर्थिक सहायाने नेत्रदाह साथरोग नियंत्रण कार्यक्रम

जुन 2023 पासुन भारतात नेत्र दाह फ्लू हा आजार मोठा प्रमाणात सुरू झालेला होता. सुरुवातीला प्रमाण कमी होते जुलै, ऑगस्ट मध्ये प्रमाण वाढले. घरातील प्रत्येक सदस्य नेत्रदाह साथ रोग आजाराने त्रस्त होत. साने गुरूजी फिरते रुग्णालय च्या माध्यमातून जनजगृती व तपासणी ,उपचार,निदान, व मार्गदर्शन मोफत 40 गावात शिबिर राबवून डोळे येणे साथ रोग नियंत्रण कार्यक्रम. अंतर्गत सुमारे 40.000 लोकांन पर्यंत पोस्टर,अडिओ

क्लीप, बॅनर,माध्यमातून लोकांनमध्ये जाऊन.तसेच डोळात टाकायाचा निबोळा, ड्रॉप,गोळा,2000 लोकांना या शिबिराच्या फायदा झाला.
नेत्रदाह साथरोग नियंत्रण कार्यक्रम ऑगस्ट ते सप्टेबर दरम्याण राबविण्यात आला. डॉ. सुजाता जोशी पाटोदेकर, नेत्ररोग तज्ञ नांदेड, डॉ. इंद्रायणी केंद्रे, अजय नरड आणि नागेश देवतळे या टिमच्या माध्यमातुन केले.

**13.08.2023 नाक, कान, घसा तपासणी व दंत तपासणी शिबीर**

डॉ. अनिल पटेल, नाक,कान,घसा तज्ञ, यवतमाळ, डॉ. नितीन जोशी, एंडोस्कोपी सर्जन नांदेड व डॉ. अश्विनी भंडारे, दंतरोग तज्ञ, किनवट यांनी तपासणी केली. साने गुरुजी किनवट येथे झालेल्या शिबीरात 38 तर मारेगाव (खालचे) येथे झालेल्या शिबीरात 34 रुग्णांनी लाभ घेतला.

**20.08.2023 आरोग्य शिबीर**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि प्रधामंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत आरोग्य शिबीर साने गुरुजी रुग्णालय किनवट येथे घेण्यात आले. या शिबीरात डॉ. ए.आर.फारुखी, एम.डी. डॉ. सय्यदा सबा पटेल, स्त्रीरोग तज्ञ,नांदेड, डॉ. स्वप्नील विजय पैठणे व सहकारी, नांदेड यांनी रुग्णतपासणी केली. या शिबीरात 250 रुग्णांनी लाभ घेतला, गरजु रुग्णांची रक्ततपासणी, इ.सी.जी., इत्यादी तपासणी मोफत करण्यात आली.

**22.08.2023 कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबीर (सवलतीच्या दरात)**

साने गुरुजी रुग्णालयात सवलतीच्या दरात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले, डॉ. अशोक बेलखोडे , सर्जन यांनी एकुण 03 महिलांच्या शस्त्रक्रिया केल्या.

वर्षभरात दर महिण्याच्या 01 तारखेला अशा सवलतीच्या दरात कु.क.शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन करण्यात आले. वर्षभरात या शिबीराच्या माध्यमातुन ----- महिलांनी शस्त्रक्रिया करवुन घेतल्या.

**दि. 24.12.2023 माता व बाल रुग्णालयाचा भुमीपुजन सोहळा**

रमा पुरषोत्तम फाउंडेशन पूणे यांच्या आर्थिक सहकार्याने साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एम.आय.डी.सी. किनवट येथील फेज दोन म्हणजे माता व बाल रुग्णालयाच्या इमारतीचे भुमीपुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकरराव मुधोळकर, हिमायतनगर हे होते. सध्याच्या साने गुरुजी रुग्णालयात प्रसुत झालेल्या माता व त्यांच्या पाल्यांच्या हस्ते हे भुमीपुजन करण्यात आले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान, प्रा. राप्रसाद तौर, गिरीष सरदेसाई, अखील पांड्या , प्रशांत मुसळे, हितेश शहा, उदय यादव, ॲड मिलींद सर्पे, भारत जोडो यात्री पुरुषोत्तम जोशी, शुभांगी आबनावे, मुरलीधर बेलखोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

**MUMMY फिरता दवाखाना**

ग्रामीण भागातील लोकांची ढासळलेली आर्थिक परिस्थीती, दळणवळणाची साधने बंद झाल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य विषयक वाढलेली गरज लक्षात घेऊन पुर्वीपासून सुरू असलेला फिरता दवाखानाच्या गावांची संख्या व वेळ वाढवुन व फेऱ्या वाढवून दररोज 5 ते 6 गावांतून आरोग्य सेवा देण्यात आल्या. परंतु इंधनाचा खर्च आवाक्याच्या बाहेर जात असल्याने फिरता दवाखाना यावर्षी निवडक आणि जवळपासच्या गावांत सेवा दिली. फिरता दवाखान्याचे विभाग डॉ. विजय काळे, डॉ. इंद्रायणी केंद्रे, डॉ. दूर्गा काकडे यांनी सांभाळली.

## शिक्षण

- **साने गुरुजी कला महाविद्यालय, इस्लापुर**

सन 2023-24 प्रवेश

बी.ए.प्रथम वर्ष - 24

बी.ए.द्वितीय वर्ष -04

बी.ए.तृतिय वर्ष - 10

असे एकुण 38 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला

(वर्षभरातील कार्यक्रमांचा अहवाल स्वतंत्रपणे केलेला आहे.)

- **साने गुरुजी प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) बोधडी.**

सन 2023-24 प्रवेश

नर्सरी /एल.के.जी./यु.के.जी. - 49

वर्ग पहिला - 21

वर्ग दुसरी - 20

वर्ग तिसरी - 12

वर्ग चौथी - 07

असे एकुण 109 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र,**

- **साने गुरुजी रुग्णालय (भारत जोडो युवा अकादमी), किनवट**

या वर्षी रुग्णसहायक / सहायिका अभ्यासक्रमासाठी 01 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

- **साने गुरुजी कला महाविद्यालय, अभ्यासकेंद्र, इस्लापुर**

सन 2023-24 या शैक्षणिक वर्षामध्ये साने गुरूजी कला महाविद्यालय इस्लापूर येथील अभ्यासकेंद्रात

| | | |
|---|---|---|
| बी.ए. प्रथम वर्षासाठी | - | 03 |
| बी.ए.द्वितीय वर्षासाठी | - | 05 |
| बी.ए.तृतिय वर्षासाठी | - | 00 |

असे एकुण 08 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

## विज्ञान

**दि. 23.02.2024 तालुका विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र किनवट.**

**तालुका विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, साने गुरुजी रुग्णालय परिसरात नविन इमारतीमध्ये सुरु करण्यात आले, अजय नरड यांची या केंद्राच्या प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली.**

**दि. 29.08.2023 शनिवारी विज्ञान वारी**

**मराठी विज्ञान परिषद किनवट विभागातर्फे किनवटमधील ब.पा. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील 10 विद्यार्थी म.वि.प. जालना येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले होते.**

**या प्रशिक्षीत विद्यार्थ्यांनी किनवट परिसरातील संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय, दुधगाव, जि.प. माध्यमिक शाळा किनवट, उत्तमराव राठोड हायस्कुल गोकुंदा, सुमतिबाई हेमसिंग नाईक विद्यालय, सुभाषनगर, शासकिय आश्रमशाळा, मंगाबोडी या पाच शाळांमधुन विज्ञान प्रयोग प्रात्यक्षिक करुन प्रशिक्षण दिले. ऑगस्ट 2023 ते फेब्रुवारी 2024 या दरम्याण झालेल्या या कार्यक्रमांचा एकुण 242 विद्यार्थ्यांनी शनिवारी विज्ञान वारी या उपक्रमाचा लाभ घेतला. प्रा. सुरेंद्र शिंदे यांनी उपक्रमाचे नियोजन केले.**

**दि. 26 ते 27.03.2024 संशोधनाकडे वळा व्याख्यान**

**सरस विद्यालय मांडवी, बळिराम पाटिल महाविद्यालय, गोकुंदा, जोशी कोचिंग क्लासेस गोकुंदा, आदिवासी आश्रमशाळा खेर्डा, जगदंब क्लासेस किनवट, सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या शाळा किनवट या ठिकाणी झालेल्या या उपक्रमाचा लाभ एकुण 590 विद्यार्थ्यांनी घेतला. व्याख्याते व**

**विज्ञान संशोधक विक्रम फुलवाले, म.वि.प. मुंबई यांनी सर्व शाळांमधुन विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन केले.**

**दि. 23.02.2024 रोजी राष्ट्रिय विज्ञान दिनानिमीत्त** निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पोदार लर्न स्कुल, सरस्वती विद्या मंदीर प्राथमिक शाळा, डायमंड ज्युबली ईंग्लीश स्कुल, शासकिय आश्रम शाळा या किनवट शहरातील शाळांतील शिक्षक व 145 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

**अंधश्रद्धा निर्मुलन समिती**

दि. ----------------- रोजी झालेल्या अं.नि.स. च्या बैठकीत किनवटच्या नुतन कार्यकारीणीची निवड करण्यात आली, यावेळी अंनिसचे, राज्य कार्याध्यक्ष, माधव बावगे, डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. उमाकांत इंगोल, ॲड मिलींद सर्पे, बालाजी शिरसाठ, प्रा.डॉ. पंजाब शेरे, स्वप्नील भालेराव उपस्थित होते.

अ.नि.स. किनवटच्या अध्यक्षपदी प्रा. उमाकांत गुणवंतराव इंगोले, उपाध्यक्ष स्वप्निल भालेराव व प्रा. सुलोचना जाधव यांची निवड करण्यात आली.

## महिला विभाग

**दि. 11.10.2023 जागतिक कन्या दिन** निमीत्त **Respect every girl Child " ति उद्याची माता आहे तिचा आपण सर्व आदर करूया "** असे घोषवाक्य असलेले बॅनर किनवट शहरात लावून जनजागरण करण्यात आले.
किनवट शहरातील सरस्वती विद्या मंदिर प्राथमिक शाळा किनवट, सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या शाळा, सुभाषनगर किनवट, गुरुकुल आश्रमशाळा, रामनगर किनवट या शाळांमध्ये साने गुरुजी रुग्णालयातील एक परिचारीका व एक सामाजिक कार्यकर्ता यांनी जाऊन घोषवाक्य विषद केली.

**दि. 18.03.2023"भारत जोडो युवा अकादमी तर्फे एकल पालकांच्या मुलींना शिक्षण सहाय्य निधीचे वाटप"**

आज दिनांक 30 मार्च 2024 रोजी भारत जोडो युवा अकादमी, साने गुरुजी रूग्णालय किनवट येथे ज्या मुलींच्या आई वडीलांपैकी एकच पालक असणाऱ्यांसाठी मागील वर्षापासून नविन उपक्रम सुरू करण्यात आले आहे. या वर्षी एकुण 20 मुलींना प्रत्येकी 5000 रूपये असे एकुण 1 लाख रूपयांची मदत करण्यात आली आहे.

**दिनांक 24.07.2023** ***मणिपूर हिंसाचार: सहविचार सभा***

साने गुरूजी रूग्णालय, किनवट येथे 24 जुलै 2023 रोज, सोमवार सायंकाळी ठिक 5:00 वाजता ***मनिपूर हिंसाचारात मारल्या गेलेल्या पिडीतांना श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते***.याप्रसंगी डॉ. अशोक बेलखोडे , प्रा. पंजाब शेरे व अॅड . मिलींद सर्पे , प्रा. वसंत राठोड , प्रा. शिवाजी गायकवाडा, माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान व के. मुर्ती यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्वप्नील भालेराव, प्रा. सुनिल व्यवहारे, संदिप चनमनवार, प्रा. उमाकांत इंगोले, प्रा. विजय खुपसे, प्रा. सुभाष काळे, अनुराज पेंदोर इत्यादी उपस्थित होते.



असे बॅनर लावून मनिपुर येथील हिंसाचार थांबविण्यासाठी आवाहन करण्यात आले.

## बाल विभाग

**दिनांक:17-सप्टेंबर 2023 शाळे बाहेरील शाळा**

ठिकाण: साने गुरूजी रुग्णालय व संशोधन केंद्र. किनवट
वेळ: सकाळी 9.30 दुपारी 2
सदर शाळे बाहेरील शाळा या उपक्रमात 9 मुली व 8 मुल हे इयता 7 वी चे होते. सरस्वती विद्या माध्यमिक शाळा, बाबासाहेब नरके माध्यमिक शाळा ,व गुरुकुल माध्यमिक आश्रम शाळा किनवट येथील विद्यार्थी होते.
या कार्यक्रमाला साने गुरुजी रूग्णालय किनवट चे प्रमुख डॉ.अशोक बेलखोडे यांच्या मार्गदशन व सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.
हा उपक्रम प्रत्येक महिण्याच्या पहिला व तिसरा रविवारी अजय नरड यांनी राबविला.

**दि. 23 एप्रिल ते 29 एप्रिल 2023**

***राष्ट्र सेवा दल किनवट तर्फे आयोजित विज्ञान, छंद व साहस शिबीर साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल एम.आय.डी. सी. कोठारी किनवट येथे संपन्न झाला.***

23 ***एप्रिल ते*** 29 ***एप्रिल*** 2023 ***दरम्यान आयोजित या निवासी शिबीरात नांदेड, देगलूर, हिंगोली, बोथ मंडल (तेलंगणा) आणि किनवट तालुक्यासह*** 19 ***गावांतील*** 69 ***मुले आणि*** 33 ***मुली असे एकुन*** 102 ***विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.***

## सांस्कृतीक विभाग

**दि. 11.04.2023 क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती**

साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात म. ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

**दि. 14.04.2023 डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दरवर्षी प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साने गुरुजी रुग्णालयात साजरी करण्यात आली. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन डॉ. अशोक बेलखोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. साने गुरुजी रुग्णालयाचे कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

***दि.* 19 एप्रिल 2023 *इफ्तार पार्टी***

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रुग्णालय परिवार किनवट तर्फे आज (19 एप्रिल 2023) रोजी मुस्लिम बांधवांसाठी ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात मुस्लीम बांधव उपस्थित होते. इफ्तार नंतर साने गुरूजी रूग्णालयाच्या सभागृहामध्ये सामुहिक नमाज अदा करण्यात आली. देशाची शांतता, एकता व अखंडता अबाधित राहो यासाठी प्रार्थना (दुआ) करण्यात आली.

या प्रसंगी किनवट नगरीचे माजी नगराध्यक्ष इसाखान, के. मुर्ती, साजीद खान, योगशिक्षक अखिल खान, जामा मशीदीचे मौलाना यांच्यासह हिना भाटी, पत्रकार मिलींद सर्पे, भैय्याजी बेलखोडे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. डॉ. विजय एदलाबादकर, डॉ. शिवाजी गायकवाड, नसिर तगाले, डॉ. विजय काळे यांच्यासह बहुसंख्य मुस्लीम बांधव तसेच साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सर्व सदस्य, कर्मचारी रूग्ण व रूग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

**दि. 02.10.2023 महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्रीजींची जयंती :-**

साने गुरूजी रूग्णालय परिवाराचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे यांनी दिनांक 02 ऑक्टोबर रोजी साने गुरूजी रूग्णालय परिसरात आयोजीत केलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान, थोर व्यक्तिमत्व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती निमीत्त आदरांजली अर्पण करण्यात आली.

**दि. 28.10.2023 एन.आय.सि.यु. चे उद्घाटन आणि MUMMY चे लोकार्पण सोहळा**

साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात रोटरिअन स्वाती हेरकळ, पुणे आणि मा. श्री. एस. कार्तिकेयन (सहा. जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, किनवट) यांच्या हस्ते 10 बेडचा नवजात शिशु अती दक्षता विभाग (NICU) आणि रोटरी क्लब पुणे सहवास व वन नेटवर्क इंटरप्रायजेस यांच्या सॉजन्याने गरोदर महिलांच्या तपासणीसाठी सर्व सोयींनी युक्त पिरता दवाखाना यांचा संयुक्त लोकार्पण सोहभ संपन्न झाला.

यावेळी रोटरीअन सुधीर लातुरे, किशोर पावडे , समीर कुलकर्णी, उमेश गरुडकर , डॉ. ओम मोतीपवळे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती .

याप्रसंगी भारत जोडो युवा अकादमीचे सचिव माधव बावगे, सदस्य मुरलीधर बेलखोडे, माजी गटशिक्षणाधिकारी अरुणकुमार वतनीवकील, नांदेडचे डॉ. अश्विन लव्हेकर, भुमन्ना बोल्लेवार, भैयाकाका बेलखोडे, वार्ताहर प्रदिप वाकोडीकर, गोकुळ भवरे, ॲड . मिलींद सर्पे, माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान, हबिब समनानी, प्रा. सागर शिल्लेवार, डॉ. विजय काळे, नारायणराव सिडाम, घुगे साहेब, भारती साबळे यांच्यासह किनवट परिसरातील डॉक्टर्स व साने गुरुजी रुग्णालय परिवारातील सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. साने गुरुजी रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**दिनांक 10.11.2023 धन्वंतरी पुजन आणि वैद्यकीय विद्याशाखा व औषध निर्माणशास्त्र शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थी व पालकांचा सत्कार सोहळा**

डॉक्टर्स असोसिएशन किनवट, केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशन किनवट व साने गुरूजी रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने धन्वंतरी पुजन आणि वैद्यकीय विद्याशाखा व औषध निर्माणशास्त्र शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थी व पालकांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.10 नोव्हेंबर 2023 रोजी साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल एमकोठारी येथे झालेल्या .सी.डी.आय. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉमोहित शोलापूरकर ., प्रसिध्द मानसोपचार तज्ञ, नांदेड उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डॉ सुरेंद्र शिंदे होते साने गुरूजी रूग्णालयाचे संचालक डॉअशोक बेलखोडे ., डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉशिरीष पत्की ., केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजाराम गटलेवार, डॉ.बालाजी तेलंग हे मंचावर उपस्थीत होते .

प्रारंभी सत्कारार्थी विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या हस्ते नवीन होणाऱ्या या रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले या सत्कार सोहळ्यात किनवट व माहूर परिसरातील एकुण 63 वैद्यकीय

विद्या शाखेतील नवीन प्रवेशित एमबीबीएस, बिडीएस, बिएएमएस, बीएचएमस बीपीटीएस, पशु वैद्यकीय शाखा तसेच डी फार्मसी व बी फार्मसी या पदवी करीता प्रवेशित झालेले विद्यार्थी व पालकांचा पुष्पगुच्छ, पुस्तक व प्रमाणपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आलाशिक्षक सुनील . पाठक,पालक सुनील गिते, विद्यार्थीनी कुअश्विनी उईके ., कु वैष्णवी गुट्टे कु सानिया शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी अरूण वतनीवकील, भैय्याजी बेलखोडे, प्रासुनिल व्यवहारे .डॉ ., प्रादिलिपसिंह . चंदेल, डॉशिवाजी गायकवाड ., डॉबालाजी नागरगोजे ., डॉसुरेंद्र जन्नावार ., डॉअभिजीत . ओव्हळ, डॉसतिष सोरटे ., डॉअमोल चिन्नावार ., ज्ञानेश्वर उईके, डॉविजय काळे ., डॉइंद्रायणी . केंद्रे, प्रादमकोंडवार ., उदय गंधेवार, डॉ.ओम पाटील सुर्यवंशी हे उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख डॉअशोक बेलखोडे यांन .ी केलेमोहितकुमार शोलापूरकर यांनी .डॉ . शिरीष पत्की यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर .डॉ .विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले .राजाराम गटलेवार यांनी उपस्थितांचे आभार मानले

**दि. 06 डिसेंबर 2023** महापरिनिर्वाण दिन डॉ. बाबासाहेबांना अभिवादन....

आज दिनांक 06 डिसेंबर 2022 रोजी मानवमुक्तीचे प्रणेते, भारतीय संविधान निर्माते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना साने गुरूजी रूग्णालय परिसराच्या प्रांगणात अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी, गावातील नागरीक, विद्यार्थी, रूग्ण आणि रूग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

**24.12.2023 साने गुरुजी जयंती**

साने गुरुजी जयंती निमीत्त दरवर्षी प्रमाणे रंगभरण व चित्रकला स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. चित्रकला स्पर्धेसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा किनवट यांनी आर्थिक सहकार्य केले.

**26.12.2023 बाबा आमटे जयंती**

बाबा आमटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

**दि. 09.08.2023 आदिवासी दिन**

आदिसावी दिना निमित्त भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांनी सोशल मिडियावर व्हि.डि .ओ. च्या माध्यमातुन आपले मनोगत मांडत शुभेच्छा दिल्या.

**दि. 15.08.2023 भारताचा 75 वा स्वातंत्र्यदिन साजरा**

आज रोजी सकाळी 8.45 वाजता साने गुरूजी रूग्णालयाच्या इमारतीवर झेंडा फडकवुन भारताचा 75 वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, भैय्याजी बेलखोडे, साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सदस्य, सर्व कर्मचारी वृंद, रूग्ण व रूग्णांचे नातेवाईक, शालेय विद्यार्थी व गावातील  नागरीक उपस्थित होते.

ध्वजारोहनानंतर सर्व उपस्थितांना अल्पोपहार व चहा देण्यात आला.

दि. 04.01.2024 सिंधुताई सपकाळ पुण्यतिथी

जेष्ठ सामाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या पुण्यतिथी निमीत्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन डॉ. अशोक बेलखोडे यांनी त्यांच्या कार्याची संक्षीप्त माहिती दिली. यावेळी साने गुरुजी रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

**दि. 17.09.2023 मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा**

साने गुरूजी रूग्णालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यात आला. रूग्णालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकविण्यात आला. डॉ. अशोक बेलखोडे यांनी मराठवाड्याच्या मुक्तीसंग्रामात लढलेल्या अनेक स्वातंत्र्यसेनानींचे बलिदानाची आठवण यावेळी करून दिली.

दि. 23.02.2024 संत गाडगेमहाराज जयंती

साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन डॉ. अशोक बेलखोडे यांनी मार्गदशर्न केले. यावेळी पोदार लर्न स्कुल, सरस्वती विद्या मंदीर प्राथमिक शाळा, डायमंड ज्युबली  ईंग्लीश स्कुल, शासकिय आश्रम शाळा या किनवट शहरातील शाळांतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

, सेंट मेरी ईंग्लीश स्कुल

**साने गुरुजी रुग्णालय परिवारातिल सदस्यांचा सत्कार**

**---------------------**

## नाम फाऊंडेशन

**दि. 13.11.2023 दिवाळी भेट**

किनवट, माहूर व हिमायतनगर तालुक्यातील 50 आत्महत्याग्रस्त  शेतकऱ्यांच्या  कुटूंबांना दिवाळी भेट म्हणुन साडी -चोळी व फराळाचे साहित्य त्यांच्या घरी जाऊन देण्यात आले.

## राष्ट्र सेवा दल

***दि.* 23 *एप्रिल ते* 29 *एप्रिल* 2023 :-*विज्ञान, छंद व साहस शिबीर***

राष्ट्र सेवा दल किनवट तर्फे आयोजित विज्ञान, छंद व साहस शिबीर साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल एम.आय.डी. सी. कोठारी किनवट येथे संपन्न झाला.

23 एप्रिल ते 29 एप्रिल 2023 दरम्यान आयोजित या निवासी शिबीरात नांदेड, देगलूर, हिंगोली, बोथ मंडल (तेलंगणा) आणि किनवट तालुक्यासह 19 गावांतील 69 मुले आणि 33 मुली असे एकुन 102 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक 23 एप्रिल रोजी या शिबीराचे उद्घाटन -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. नाना शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पुष्पाताई कोकीळ होत्या, प्रा. बालाजी कोंपलवार व नांदेड जिल्हा महिला सेवादल प्रमुख डॉ. योगिनी शिंदे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्राचे डॉ. उमाकांत इंगोले प्रमुख पाहूणे म्हणुन उपस्थित होते.

या सात दिवशीय निवासी शिबीराचा समारोप सोहळा दि. 28 रोजी शुक्रवारी सांयकाळी 4.00 वाजता करण्यात आला. अध्यक्षस्थानी माधव बावगे लातूर, प्रमुख अतिथी प्रा. रामप्रसाद तौर, यांच्यासह मंचावर पालक प्रतिनीधी बळीराम राठोड, शिबीर संयोजक डॉ. अशोक बेलखोडे हे उपस्थित होते. दि.29 रोजी सकाळी ध्वजारोहणानंतर शिबीरार्थी आपापल्या गावी परत गेले.

टिप :- शिबीराचा स्वतंत्र अहवाल सोबत जोडला आहे.

## वार्षिकोत्सव

**साने गुरुजी जयंती व साने गुरुजी रुग्णालयांचा 27 वा रुग्णालयांचा वर्धापन दिन सोहळा उद्घाटन**
**किनवट:- 24 डिसेंबर**

किनवट येथे साने गुरूजी जयंती व साने गुरूजी रूग्णालयाच्या 28व्या वर्धापन दिनानिमीत्त शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन दिनांक 24 डिसेंबर 2023 रोजी सकाळी 10.00 वाजता साने गुरूजी रुग्णालयाच्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते.

या सोहळ्याचे उद्घाटन कवी, गीतकार, रंगकर्मी प्रा. डॉ. विनायक पवार कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यार्थीनी कु. अनुष्का कुडमेथे व प्रमुख पाहूणे यांनी दीपप्रज्वलन व साने गुरूजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन भारत जोडो सायकल यात्री पुरूषोत्तम

जोशी, शुभांगी आबनावे, माधव बावगे, अंधश्रध्दा निर्मुलन समिती, राज्य कार्याध्यक्ष लातूर, पुणे येथील आर्किटेक्ट गौतम मेहता, श्री. अमेय समेळ, सुनिल राठोड, महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा किनवट हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक डॉ. अशोक बेलखोडे यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक पुरस्कृत चित्रकला स्पर्धेचे उदघाटन परिसरातील प्रसिध्द चित्रकार शिवराज बामणीकर व कलाशिक्षीका कविता जोशी, नांदेड यांनी चित्र काढुन केले. माधव बावगे यांनी विविध भाषेतील भारत जोडो चे नारे विद्यार्थ्यांना शिकविले व कु. तेजस्विनी उईके हिने “माय नेम इज इंडीया” या सर्व भारतीय भाषेतील राष्ट्रीय एकात्मतेच्या गीतावर आपले नृत्य सादर केले. या चित्रकला स्पर्धेमध्ये किनवट व परिसरातील एकुण 1000 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाला निसर्गसेवा समिती वर्धेचे मुरलीधर बेलखोडे, पत्रकार गोकुळ भवरे, डॉ. प्रताप परभणकर, डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य सुभाष काळे, मुख्याध्यापक बशी सर, शिरपूरकर सर, पवार सर, भैय्याजी बेलखोडे, अश्विनी उईके यांच्यासह विविध शाळेचे शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीयतेसाठी साने गुरूजी रूग्णालयाचे सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले तर उत्तम कानिंदे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

**रंगभरण व चित्रकला स्पर्धा**

महाराष्ट्र ग्रामीण बँक पुरस्कृत चित्रकला स्पर्धेचे उदघाटन परिसरातील प्रसिध्द चित्रकार शिवराज बामणीकर व कलाशिक्षीका कविता जोशी, नांदेड यांनी चित्र काढुन केले.

या चित्रकला स्पर्धेमध्ये किनवट व परिसरातील एकुण 1000 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**माता व बाल रुग्णालयाचा भुमीपुजन सोहळा**

रमा पुरषोत्तम फाउंडेशन पूणे यांच्या आर्थिक सहकार्याने साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एम.आय.डी.सी. किनवट येथील फेज दोन म्हणजे माता व बाल रुग्णालयाच्या इमारतीचे भुमीपुजन करण्यात आले.

**सांस्कृतिक कार्यक्रम सायं. 4 ते 7.30**

शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित या कार्यक्रमात किनवट परिसरातील विविध शाळांतील 140 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, यावेळी गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने, माजी गटशिक्षणाधिकारी अनिल महामुने, उत्त्म कानिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**स्व. उत्तमरावजी राठोड स्मृती संगीत महोत्सव रात्री 8.00 वा.**

या कार्यक्रमात मानसी स्वरुप देशपांडे व स्वरुप प्रमोद देशपांडे यांचे सुगमगायन झाले. तबल्यावर प्रशांत गाजरे, वायोलीनवर पंकज शिरभाते, हार्मोनियम व संगीत संयोजन प्रमोद देशपांडे यांनी साथ केली.
यावेळी किनवट परिसरातील संगीतप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**25 डिसेंबर 2022 युवा शिबीर**

विषय :-कायदा अंधश्रद्धा निर्मुलनाचा

पाटील पोलीस प्रशिक्षणाचे सभागृह गोकुंदा किनवट येथे युवकांसाठी कायदा अंधश्रद्धा निर्मुलनाचा या विषयावर सप्रयोग व्याख्यानाचे आयोजन केले होते

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सप्रयोग मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात 90 विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- संचालक, पाटील पोलीस प्रशिक्षण, गोकूंदा
प्रमुख वक्ते :- अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे
उपस्थित मान्यवर:- श्री मुरलीधर बेलखोडे, प्रा. शिवाजी गायकवाड, प्रा. पंजाब शेरे.

**श्रमर्षी बाबा आमटे व्याख्यानमाला**

प्रमुख व्याख्याते डॉ. प्रल्हाद लुलेकर हे होते तर प्रा. वासुदेव मुलाटे हे प्रमुख पाहूणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी शासकिय भरतीपूर्व पोलिस प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी, प्रा. पंजाब शेरे व शिक्षकवृंद उपस्थित होते.

**कवि संम्मेलन**

अध्यक्ष :- प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर

या कवि संम्मेलनात प्रा. प्रकाश घोडके, पुणे आणि गितकार प्रा. विनायक पवार, कवी प्रा. आदित्य इंगोले , नांदेड यांनी कविता सादर केल्या, कार्यक्रमाचे संयोजन प्रा. पंजाब शेरे यांनी केले.

दि. 26.12.2023

**भौतिकोपचार प्रशिक्षण**

सु.हे.नाईक कन्या विद्यालयात डॉ. शिवानी बेलखोडे व डॉ. मधुसुदन यादव यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले यावेळी 300 विद्यार्थीनी व शिक्षक उपस्थित होते.

**बाबा आमटे जयंती**

बाबा आमटे यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन डॉ. अशोक बेलखोडे यांनी बाबा आमटे यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले.

## सदिच्छा भेट / पाहुण्यांच्या भेटी

साने गुरुजी इमर्जंसी व मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल, एम.आय.डी.सी. किनवट येथील बांधकामास अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या

**दिनांक :- बुजृक देशपांडे, पुणे**

## शाबासकी

दिनांक 2024 मार्च 2-
रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास आयोजित
*Vocational Excellence Award* **व्यावसायीक गुणवत्ता पुरस्कार**
वार शनिवार-
वेळ 10 सकाळी-.00 ते 100.
स्थळ सेवाभवन हॉल-, सीडीएसएसजवळ

**24.03.2024 एक लाख कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया पुर्ण केल्याबद्दल राजेंद्र दर्डा, दै. लोकमतचे संपादक यांनी शुभेच्छा दिल्या.**

## भविष्य / पुढचे पाऊल

- **साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल – एम.आय.डी.सी. किनवट**

## दानशूर दाते

सन 2023-24 मध्ये --- देणगीदारांनी संस्थेला 4,85,16,809/- **इतकी देणगी दिली. संस्थेच्या साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल, किनवटसाठी दात्यांनी देणगी दिली. त्यात आर.पी.एफ. फाउंडेशन यांनी भरघोस मदत केली.**

## सहवेदना

**दिनांक 04.08.2023 डी.एन.महानोर यांना श्रद्धांजली**

या प्रसंगी डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. पंजाब शेरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या तर यावेळी प्रा. रामप्रसाद तौर, अॅड मिलिंद सर्पे, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, प्रा. उमाकांत इंगोले, प्रा. वसंत राठोड, प्रा. सागर शिल्लेवार व साने गुरुजी रुग्णालय परिवारातील सदस्य उपस्थित होते.

**दिनांक 14 ऑगस्ट 2023** रोजी साने गुरूजी रूग्णालय किनवट येथे परिवर्तनवादी विचारवंच प्राचार्य प्रतापराव बोराडे, हॅलो मेडिकल फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. शशीकांत अहंकारी, सत्यशोधक विचारवंत प्रा. हरी नरके, तेलंगणातील क्रांतीकारी कवी गदर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, प्रा. डॉ. पंजाब शेरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या तर यावेळी प्रा. रामप्रसाद तौर, अॅड मिलिंद सर्पे, डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य सुभाष काळे, प्रा. सुलोचना जाधव, प्रा. विजय खुपसे, डॉ. वसंत राठोड, प्रा. दगडू भरकड, श्री. दिनेश राठोड, संजय बोलेनवार, नितीन टापरे, अजय नरड, कु. अश्विनी उईके, कु. तेजस्विनी उईके,विकास बोलेनवार, नितीन पवार, निखील कड्डू, नागेश इत्यादी उपस्थित होते.